डॉ. सुजाता चव्हाण

# इच्छापत्र
# मृत्युपत्र
# (WILL)



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# इच्छापत्र / मृत्युपत्र (WILL)

(कायदेविषयक)

## लेखिका : डॉ सुजाता चव्हाण

# इच्छापत्र / मृत्युपत्र  (WILL)

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे.  प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# इच्छापत्र / मृत्युपत्र  (WILL)

लेखिका :     डॉ सुजाता चव्हाण,

Asst.prof. : Advanced centre for women studies

Tata Institute for Social Sciences

drsujatachavan61@gmail.com

phone no.09867934108

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २७ जुलै २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. सुजाता चव्हाण

डॉ. सुजाता चव्हाण यांचे हे ई साहित्यतर्फ़े प्रकाशित होणारे सहावे पुस्तक. याशिवायही त्यांनी अनेक पुस्तके लिहीलेली आहेतच. कायदेविषयक डॉक्टरेट व टाटा इंस्टिट्युटमध्ये प्राध्यापिका असलेल्या सुजाताजी आपल्या इतर वेळात सर्वसामान्य लोकांना समुपदेशन करणे व कायदेशीर तसेच कौटुंबिक समस्यांवर सल्लागार म्हणून मदत करतात. त्यांना स्वयंपाकाचीही आवड आहे आणि ई साहित्यतर्फ़े त्यांचे खाऊ आनंदे नावाचे विविध व्यंजनप्रकारांवरचे पुस्तकही गाजले आहे. सुजाताजींचे हे पुस्तक वाचकांना उपयुक्त ठरेल. आपली मते जाणून घेण्यास त्या उत्सुक आहेत.



डॉ. सुजाता चव्हाण - ९८६७९३४१०८
बी.एस.सी, ऑडिओलॉजी अँड स्पीच थेरपी,
एम.एस.डब्ल्यू,(मेडिकल अँड सायकॅट्रिक सोशियल वर्क)
पी.जी. डिप्लोमा Human Rights
पी.एच.डी.(लॉ)

# डॉ. सुजाता चव्हाण यांची ई साहित्यवरील पुस्तके


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/khaoo_anande_sujata_rajeshri.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kutumb_nyayalay_sujata_chavan.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sankalan_sujata_chavan.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vachadosh_sujata_chavan.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/hirkani_sujata_chavan.pdf



प्रिय वाचक,

हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात आयुष्यमान वाढले असले तरी कोणाला आपण किती जगणार हे माहित नसते. मृत्यू अकस्मात आल्यास आपल्या पश्चात आपल्या संपत्तीचे वाटप शांततेत/ सुरळीत पार पडेल ह्याची खात्री नसते. प्रॉपर्टी वरुन भावाभावांमध्ये वाद होतात हे काही नवीन नाही. हे टाळायचे असेल तर इच्छापत्र हा सुलभ, सोपा मार्ग ठरतो.

आपली संपत्ती आपल्यानंतर आपल्या इच्छेनुसार देण्यासाठी इच्छापत्र हा सुखकर मार्ग आहे.

इच्छापत्र कसे करावे? कोण करु शकते? केव्हा करावे? त्यासाठी वकिलांची गरज असते का? ते खूप कठीण असते का? खर्चिक असते का? असे अनेक प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात येतात. ह्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी हा लेखन प्रपंच.

मृत्यूपत्र करणे अजिबात जिकीरीचे वा खर्चिक नसते. शिवाय आपल्याला हव्या त्या व्यक्तीला आपण आपली संपत्ती देऊ शकतो, तसेच वैयक्तिक कायद्यानुसारच्या वारसदाराला जर संपत्ती द्यायची नसेल तर तसेही करता येते.

कायद्याची खूपदा बऱ्याच जणांना भिती वाटते. पण कायदा आपल्या मदतीसाठी असतो, घाबरावयास नाही. म्हणून कायद्याची भिती बाळगू नका. इच्छापत्राबद्दल माहिती करुन घ्या व आपले इच्छापत्र आपण स्वत:च तयार करा. अगदीच काही गुंतागुंतीच्या बाबी असतील तर वकिलांचा सल्ला जरुर घ्यावा.

आशा आहे की पुढे दिलेली माहिती सर्वसामान्यांना उपयोगी ठरेल.

आपली विश्वासू,

डॉ. सुजाता मोरे चव्हाण

(Email.id. drsujatachavan61@gmail.com)

२२-०५-२०१९

# इच्छापत्र / मृत्युपत्र  (WILL)

**विषयानुक्रम**


मृत्युपत्र म्हणजे काय?

इच्छापत्र का करावे?

इच्छापत्र कोण करु शकतो?

वैध इच्छापत्राचे घटक -

इच्छापत्र कोठे ठेवावे?

इच्छापत्र कसे बदलता / रद्द करता येते?

प्रोबेट म्हणजे काय?

मृत्यूपत्राचे प्रकार -

इच्छापत्र करण्याची पूर्वतयारी -

मृत्यूपत्राचा नमूना

थोडक्यात लक्षात ठेवण्याच्या बाबी


२२-०५-२०१९

## मृत्युपत्र म्हणजे काय?

आपली संपत्ती आपल्या मृत्यूनंतर कोणाला मिळू शकते? ह्यासाठी आपल्याकडे कायदेशीर तरतूदी आहेत. संपत्तीची विभागणी मृत्यूनंतर दोन प्रकारे होऊ शकते.

१. मृत व्यक्तीने आपली इच्छा मृत्यूपत्राद्वारे करुन ठेवली असल्यास त्या मृत्युपत्राप्रमाणे संपत्तीची विभागणी होते.

२. परंतु जर असे मृत्युपत्र केलेले नसेल तर प्रचलित वारसा हक्काच्या कायद्याप्रमाणे संपत्तीचे वाटप होते.

मृत्युपत्राद्वारे जेव्हा संपत्तीची विभागणी होते तेव्हा मृत्युपत्राद्वारे वारसा म्हणजेच Testamentary Succession असे म्हणतात, व जेव्हा प्रचलित वारसा हक्काच्या कायद्यानुसार विभागणी होते तेव्हा त्याला Intestate Succession असे म्हणतात.

भारतात धर्मानुसार वारसाहक्काचे कायदे आहेत.

हिंदूंसाठी - हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ लागू होतो. परंतु सर्व धर्मांना लागू होणारा कायदा म्हणजे भारतीय वारसा कायदा १९२५. ह्या लिखाणात आपण मृत्युपत्राबद्दल माहिती घेणार आहोत म्हणून ह्या कायद्यांविषयी सखोल काही लिहित नाही.

मृत्युपत्र म्हणजे आपल्या मृत्यूनंतर आपल्या मिळकतीचे वाटप कसे व्हावे ह्या संबंधी मृत व्यक्तीने व्यक्त केलेली इच्छा होय. कायद्यात मृत्युपत्राची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे -

"मृत्युपत्र म्हणजे ते करणाऱ्या व्यक्तीने आपल्या मिळकतीची व्यवस्था आपल्या मृत्यूनंतर कशी व्हावी ह्यासंबंधीच्या इच्छांची कायदेशीररित्या केलेली उद्‌घोषणा."

ह्या व्याख्येनुसार तीन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घ्यावयास हव्यात -

१. ही उद्‌घोषणा कायदेशीर हवी.

२. व्यक्त केलेली इच्छा त्याच्या मिळकतीच्या व्यवस्थेबाबत असावी.

३. ही व्यवस्था त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर अंमलात आणणारी असावी.

आता आपण काही शब्दांचे अर्थ समजावून घेऊया.

* मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीस Testator म्हणतात म्हणजेच इच्छापत्रकार.

* इच्छापत्राद्वारे जी संपत्ती मिळते किंवा दिली जाते त्या संपत्तीस वारस देणगी (Bequest or Legacy) असे म्हणतात.

* इच्छापत्राद्वारे ज्या व्यक्तीस संपत्ती मिळते त्याला लाभवारस (Beneficiary or Legatee)असे म्हणतात.

* इच्छापत्राची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्या इच्छापत्राद्वारे ज्या व्यक्तीवर टाकलेली असते त्या व्यक्तीस व्यवस्थापक (Executor )म्हणतात.

* इच्छापत्रास जर पुरवणी लावली असेल तर त्याला पुष्टीपत्र (Codicil) असे म्हणतात. पुष्टीपत्र हे इच्छापत्रात जर बदल करावयाचे असतील किंवा काही तरतूदींचा खुलासा करावयाचा असेल तर लावले जाते. पुष्टीपत्र हे स्वतंत्र इच्छापत्र म्हणून मानले जात नाही.

**इच्छापत्र का करावे?**

व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्यांची देणी काही शिल्लक असतील तर ती त्याच्या संपत्तीतून देणे कायदेशीर रित्या बंधनकारक असते. त्या व्यक्तीच्या औषधोपचारांसाठी तसेच अंतिम क्रियाकर्मासाठी लागणारा खर्च हा सर्वप्रथम संपत्तीतून दिला जावा. त्यानंतर प्रोबेटसाठी लागणारा खर्च, त्या व्यक्तीची सेवा करण्यासाठी कोणी नर्स असेल तर तिचा त्या व्यक्तीच्या निधनापूर्वीच्या तीन महिन्यांचा पगार आणि इतर कायदेशीर देणी जसे की आयकर वा इतर काही कर्जफेड हे सर्व संपत्तीतून देणे कायद्याने बंधनकारक असते.

इच्छापत्र असल्यास हे सर्व दिल्यानंतर उरलेली संपत्ती इच्छापत्रानुसार वाटली जावी. जर इच्छापत्र नसेल तर मृत व्यक्तीच्या धर्मानुसार, त्या कायद्यानुसार संपत्तीचे वारस ठरतात व त्यांना कायद्यातील तरतूदींनुसार संपत्तीचे वाटप होते आणि जर इच्छापत्रानुसार संपत्तीचे वाटप होऊन काही संपत्तीबद्दल इच्छापत्रात तरतूद नसेल तर अशा नमूद न केलेल्या संपत्तीचे वाटप वैयक्तिक कायद्यानुसार होते.

इच्छापत्रामुळे व्यक्ती आपल्या इच्छेनुसार आपल्या पश्चात आपल्या संपत्तीचे वाटप ठरवू शकते. शिवाय वैयक्तिक कायद्यानुसार ज्यांना संपत्ती मिळू शकली नसती अशा व्यक्तीला जर आपली संपत्ती देण्याची इच्छा असेल तर ते इच्छापत्राद्वारे साध्य होऊ शकते. त्याचप्रमाणे वैयक्तिक कायद्याने ज्याला ही संपत्ती जाऊ शकते अशा व्यक्तीला जर संपत्ती मिळू नये असे वाटत असेल तर हे इच्छापत्राद्वारे करता येते.

आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे जर एखाद्या व्यक्तीला आपल्या दुर्बल - विकल - अक्षम अशा नातेवाईकांस आपल्या संपत्तीचा जास्त हिस्सा जावा असे वाटत असेल तर ते इच्छापत्राद्वारे करता येते.

वैयक्तिक कायद्यानुसार संपत्तीच्या वाटपामध्ये कधी कधी वाद होतात व कोर्टाची पायरी चढावी लागते. असे वाद टाळण्यासाठी इच्छापत्राचा मार्ग खूप फायद्याचा ठरु शकतो.

आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे संपत्तीच्या वाटपाद्वारे अकारण व अनपेक्षित आयकर वाचवता येऊ शकतो.

थोडक्यात इच्छापत्राचे फायदे पुढील प्रमाणे –

१. आपल्या इच्छेनुसार आपल्या संपत्तीचे वाटप.

२. संपत्ती वाट्यावरुन घरात होणारी संभाव्य भांडणे / तंटे ह्यापासून मुक्तता.

३. कायदेशीर रित्या संपत्तीचे वाटप व कोर्टात जाणे टळते.

४. वारसांपैकी अक्षम - दुर्बल व्यक्तीला जास्त हिस्सा देऊ शकणे.

५. वैयक्तिक कायद्यानुसार ज्या व्यक्तीस संपत्ती मिळू शकली नसती पण त्याला ती देण्याची इच्छा असल्यास ते इच्छापत्राप्रमाणे देता येते.

६. आयकर नियोजन करता येते.

७. इच्छापत्र करणे खर्चिक नसते.

आपण आपल्या इच्छेनुसार आपल्या संपत्तीचा विनियोग / वाटप करण्याचा इच्छापत्र हा सोपा मार्ग आहे.

**इच्छापत्र कोण करु शकतो?**

इच्छापत्र हे कायद्याच्या दृष्टीने सज्ञान असलेली व्यक्ती करु शकते. म्हणजेच वयाची १८ वर्षे पूर्ण झालेली हवीत व ती व्यक्ती मानसिक दृष्ट्या सुदृढ (Soundness of mind) असावी. स्त्री वा पुरुष कोणीही इच्छापत्र करु शकतात.

मानसिक दृष्ट्या सुदृढ म्हणजे आपण काय करत आहोत ह्याची जाणीव व ज्ञान ज्याला आहे अशी व्यक्ती, आपली संपत्ती कोणती, कोणत्या प्रकारची व आपले कोणाशी काय नातेसंबंध आहेत व कोण ह्या संपत्तीचा लाभार्थी होणार आहे व व्हावयास हवा आहे ह्याबद्दलची जाणीव व ज्ञान असणे गरजेचे ठरते.

विवाहित स्त्री जी मालमत्ता आपल्या हयातीत हस्तांतरीत करु शकते त्या सर्व मालमत्तेचे इच्छापत्र करण्याचा तिला अधिकार असतो.

अंध / मूक बधीर व्यक्ती जर सक्षम असेल तर तिला इच्छापत्र करता येते.

एखाद्या व्यक्तीस वेडाचे झटके येत असतील तर जेव्हा ही व्यक्ती त्या झटक्यात नसून पूर्णपणे सक्षम मन:स्थितीत असते तेव्हा ती व्यक्ती इच्छापत्र करु शकते व हे इच्छापत्र वैध ठरते.

म्हणजेच मृत्यूपत्र करणारी व्यक्ती सज्ञान हवी व सक्षम हवी.

कोणती संपत्ती इच्छापत्राद्वारे देता येते?

आपली संपत्ती आपण देऊ शकतो म्हणजे ह्या संपत्तीवर आपला हक्क नाही अशी संपत्ती आपण देऊ शकत नाही. तसेच ज्या संपत्तीवर आयुष्यभर फक्त उपभोगण्याचा (life interest) हक्क आहे अशी संपत्ती इच्छापत्राद्वारे देता येत नाही.

वडिलोपार्जित संपत्ती वैयक्तिक कायद्यानुसार विभागली जाते. पण त्यातील आपल्या वाट्याला आलेली संपत्ती मात्र इच्छापत्राने देता येते.

**वैध इच्छापत्राचे घटक -**

१. इच्छापत्र करणाऱ्या व्यक्तीची क्षमता, अधिकार व मानसिक स्थिती.

२. कायदेशीर रित्या इच्छापत्र केलेले असावे.

३. जी संपत्ती दिली आहे त्यावर इच्छापत्रकाराचा हक्क व ती संपत्ती हस्तांतरणीय असावी.

४. इच्छापत्रात आपली संपत्ती देण्याबाबतची इच्छा स्पष्टपणे नमूद असावी.

५.स्वखुशीने हे इच्छापत्र बनवलेले असावे. कोणाच्या दबावाखाली वा जबरदस्तीने केलेले नसावे.

६. दोन साक्षिदारांच्या सह्या असाव्यात.

इच्छापत्र हे कोणत्याही प्रकारच्या कागदावर केले तरी चालते. त्यासाठी स्टॅपपेपरच असावा लागतो असे नाही. इच्छापत्र हे मृत्यूनंतर अंमलात येणार असते, ते बराच काळ चांगल्या अवस्थेत असावे ह्यासाठी वापरला जाणारा कागद टिकणारा असावा लागतो.

इच्छापत्र हे टाईप केलेले असावे असे नाही. हाताने लिहिलेलेही चालते, पण वाचू शकावे असे अक्षर व शब्द सुस्पष्ट, अर्थ गोंधळात न टाकणारे असावे.

सहसा इच्छापत्र प्रथमपुरुषी व एकवचनी असावे.

कोणत्याही प्रकारचे पेन / शाई वापरली तरी चालते. पण वर म्हटल्याप्रमाणे ते टिकणारे असावे.

शक्यतो खाडाखोड करु नये वा तसे झाल्यास तेथे स्वाक्षरी करावी.

इच्छापत्र सुस्पष्ट, सोपे व गोंधळात न टाकणारे असावे. भाषा कोणतीही चालते. इच्छापत्राच्या कितीही प्रती काढल्या तरी चालतात. पण अनावश्यक गोंधळ टाळण्यासाठी शक्यतो एकच प्रत असावी. मूळ प्रतीवर सही करावी व आवश्यक वाटल्यास त्याच्या प्रती काढून द्याव्यात.

आपण आपली संपत्ती कोणाला व किती देऊ इच्छितो हे स्पष्टपणे नमूद करावे.

वैयक्तिक कायद्यानुसार ज्याला संपत्ती जात नाही पण आपणास द्यायची आहे तर त्याचे कारणही नमूद करावे.

इच्छापत्राच्या सुरुवातीला आपली पूर्वपीठिका नमूद करावी. आपला जन्म, शिक्षण, विवाह, आपले कुटुंब, आपले नातेवाईक ह्यांच्या विषयी लिहावे.

दोन साक्षिदारांच्या सह्या लागतात. हे साक्षिदार साधारणपणे आपल्या मृत्यूनंतर हयात असतील असे पहावे. साक्षिदार, कायद्यानुसार सज्ञान व सक्षम असावेत. कधी कधी डॉक्टरांची सही साक्षिदारासाठी घेणे उपयोगी ठरु शकते.

शक्यतो लाभार्थी साक्षिदार नसावा. दोन साक्षिदारांसमोर इच्छापत्र करावे. सही साक्षिदाराच्या उपस्थितीत करायची असते. दोन्ही साक्षिदार एकाच वेळी येऊ शकत नसल्यास वेगवेगळया वेळी सही केली तरी चालते, पण इच्छापत्रकाराने त्याच्या उपस्थितीत सही करावी लागते.

साक्षिदारांचे पूर्ण नाव, वय, पत्ता त्यांच्या सही खाली लिहावेत.

इच्छापत्र हे साक्षिदाराने वाचलेले असणे गरजेचे नसते. साक्षिदार केवळ इच्छापत्रावर, इच्छापत्रकाराने त्यांच्यासमोर सही केलेली आहे ह्या गोष्टीसाठी असतो. तसेच साक्षिदाराने तसे तेथे नमूद करावे. सही केल्यावर तारिख घालावी. तारिख खूप महत्त्वाची ठरते. शेवटचे इच्छापत्र तारखेवरुन ठरते. इच्छापत्र नोंदणी बंधनकारक नाही.

**इच्छापत्र कोठे ठेवावे?**

१. इच्छापत्र हे पाकिटात घालून आपल्या कपाटात वा आपल्या विश्वासाच्या माणसाकडे किंवा बॅकेच्या लॉकरमध्ये ठेवावे.

२. इच्छापत्राची नोंदणी कायद्यानुसार करता येते.

३. इच्छापत्र बंद पाकिटात घालून निबंधकाच्या कचेरीत (Registrar) ठेवता येते.

नोंदणी करण्यासाठी उपनिबंधक (Sub-registrar) ह्याच्या कचेरीत इच्छापत्रकाराला दोन साक्षिदारांसह जावे लागते. इच्छापत्रकाराला आपल्या ओळखपत्राची प्रत न्यावी लागते. जर इच्छापत्रकार उपनिबंधकाच्या कचेरीत जाऊ शकत नसेल तर अशा परिस्थितीत उपनिबंधकाला घरी बोलावता येते.

सदर इच्छापत्र नोंदणी करण्यासाठी खूप खर्च येत नाही. केवळ पानांच्या संख्येनुसार नोंदणीशुल्क भरावे लागते.

**इच्छापत्र कसे बदलता / रद्द करता येते?**

आपण आपले इच्छापत्र कितीही वेळा बदलू शकतो. शेवटची तारिख असलेले इच्छापत्र वैध ठरते. मात्र दरवेळी नवीन इच्छापत्र करतांना ते सर्वप्रकारे योग्य प्रकारे केलेले असावे.

इच्छापत्र बदलावे लागण्याची काही कारणे पुढीलप्रमाणे -

१. संपत्तीत वाढ वा घट झाली.

२. लाभार्थीचा मृत्यू झाला.

३. व्यवस्थापकाचा मृत्यू झाला.

४. साक्षिदाराचा मृत्यू झाला.

५. इच्छापत्राच्या इच्छेत बदल झाला.

इच्छापत्राला पुष्टीपत्र करता येते. पुष्टीपत्र हे पण एक प्रकारचे इच्छापत्रच असते. पुष्टीपत्राला इच्छापत्राचाच एक भाग मानला जातो, म्हणून इच्छापत्र करतांना घ्यावयाची काळजी पुष्टीपत्र करतांना घ्यावी. पुष्टीपत्र करतांना, "मी_______________________________ तारिख _________रोजी केलेल्या इच्छापत्राचे हे पुष्टीपत्र करत आहे" असे स्पष्टपणे नमूद करावे. तसेच बदल करतांना पूर्वीच्या इच्छापत्रातील कोणते बदल हे स्पष्टपणे लिहावे.

नवीन इच्छापत्र केल्यास पूर्वीचे रद्द ठरते.

इच्छापत्रकाराने इच्छापत्र फाडून टाकल्यास ते रद्द होते. नवीन इच्छापत्र करतांना "मी पूर्वी केलेले इच्छापत्र रद्द करत आहे." असे नमूद करावे.

**प्रोबेट म्हणजे काय?**

इच्छापत्राच्या खरेपणाबद्दल जेव्हा कोर्ट निर्णय देते त्याला प्रोबेट म्हणतात.
इच्छापत्राच्या व्यवस्थापकाने प्रोबेटसाठी अर्ज करावयाचा असतो. ह्या अर्जासोबत इच्छापत्राची प्रत जोडावी लागते. जर व्यवस्थापक नेमला नसेल वा तो असमर्थ असेल तर लाभार्थी तसा अर्ज करु शकतो. ह्या अर्जात इच्छापत्रकाराचे नाव, पत्ता, मृत्यू दिनांक, वेळ, ठिकाण नमूद करावे. त्याचप्रमाणे इच्छापत्रातील एकातरी साक्षिदाराचे प्रमाणपत्र जोडावे लागते.

**मृत्यूपत्राचे प्रकार -**

१. संयुक्त मृत्यूपत्र (Joint Will) - दोन व अधिक व्यक्तींनी एकत्रितपणे केलेले मृत्यूपत्र.

२. तोंडी मृत्यूपत्र - साक्षिदारांसमोर तोंडी सांगितलेले मृत्यूपत्र.

३. हस्तलिखित मृत्यूपत्र(Holograph Will) - मृत्यूपत्रकर्त्याने हाताने लिहून तयार केलेले इच्छापत्र.

४. अटींवर आधारित मृत्यूपत्र (Conditional or Contingent Will) - एखादी घटना घडल्यानंतर त्या मृत्यूपत्राप्रमाणे वाटप होणे अथवा एखादी अट पूर्ण झाल्यावर वाटप होणे. म्हणजे जर सदर अट पूर्ण झाली नाही अथवा सदर घटना घडली नाही तर ते मृत्यूपत्र अंमलात आणता येत नाही.

**इच्छापत्र करण्याची पूर्वतयारी -**

१. मृत्यूपत्र करण्याचा निर्णय घेणे.

२. स्थावर व जंगम मिळकतीची यादी व सर्व तपशील बनवणे.

३. लाभार्थीची नावे - वय - पत्ता - नाते व काय द्यायचे हे ठरवणे.

४. गरज पडल्यास वकीलाचा सल्ला घेणे.

५. व्यवस्थापक व दोन साक्षिदार ठरवणे.

लाभार्थी मानसिक दृष्ट्या सक्षम नसल्यास पालकत्व देता येते. पालकत्व हे त्या व्यक्तीचे व त्या व्यक्तीच्या संपत्तीचे असते. पालकत्व सक्षम व्यक्तीस किंवा संस्थेस देता येते. कायदेशीररित्या वयाच्या १८ वर्षानंतर सक्षम व्यक्ती स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकते. पण मानसिकदृष्ट्या सक्षम नसल्यास वयाच्या १८ व्या वर्षानंतरही पाल्याचे निर्णय ती स्वत: घेऊ शकत नाही; पालक त्यांच्यासाठी निर्णय घेतात.

नॅशनल ट्रस्ट ॲक्ट, १९९९ हा कायदा अशा व्यक्तींसाठी उपयोगी आहे. ह्या कायद्यात २०१८ मध्ये बदल करण्यात आला आहे. ह्या कायद्यानुसार ज्या व्यक्तींना विशेष मदत लागते अशा व्यक्तींसाठी पालक नेमता येतो. ह्या व्यतिरिक्त त्या व्यक्तीचे पालक त्या व्यक्तीच्या नावे ट्रस्ट बनवू शकतात.

अशा व्यक्तींच्या पालकांना आपल्या अपत्याच्या भविष्याची खूप चिंता असते. "आपल्यानंतर ह्यांचा सांभाळ कसा होईल?" हा प्रश्न त्यांना सतावतो.

ह्या कायद्याच्या आधारे पालक नेमता येतो. ऑनलाईन अर्ज करुन पालक नेमणे त्या कायद्यामुळे सहज शक्य झाले आहे. अशा अपत्याच्या नावे त्याच्या भविष्याच्या खर्चाची तरतूद करणे पालकांना शक्य होते; जेणे करुन त्यांना त्यांच्यानंतर आपल्या अपत्याचे कसे होईल ही चिंता रहाणार नाही.

**मृत्यूपत्राचा नमूना**

कायद्यानुसार 'मृत्यूपत्र कसे असावे' असे कोठेही नमूद केलेले नाही पण ते पूर्वी म्हटल्याप्रमाणे सोप्या भाषेत - गोंधळात न टाकणारे - स्पष्ट असावे.

सुरुवातीला पूर्वपीठिका असावी.

मी ________________________ वय ______ रहाणार_______________________ धर्म _______ दिनांक ____________रोजी उत्तम शारिरीक व मानसिक अवस्थेत असतांना माझ्या मालमत्तेची कशी वाटणी व्हावी ह्यासाठी हे इच्छापत्र लिहित आहे. ह्यापूर्वी मी कोणतेही इच्छापत्र केलेले नाही. हे माझे पहिले व शेवटचे इच्छापत्र आहे.

माझा जन्म ____________ माझे शिक्षण __________ माझे लग्न ___________ माझ्या कुटुंबात __________ आहेत. माझी मिळकत पुढीलप्रमाणे________________ मी त्याचे वाटप पुढीलप्रमाणे करु इच्छितो.----

मी स्वखुशीने कोणाचेही दडपण नसतांना मनाच्या व शरीराच्या उत्तम अवस्थेत हे लिहून ठेवले आहे.

दिनांक : _____________

ठिकाण : _____________ सही : ______________________________

वरील श्री. ____________________________________ यांनी माझ्यासमोर सदर मृत्यूपत्रावर सही केली आहे. ते शारिरीक व मानसिक स्थितीत सक्षम अवस्थेत होते हे मी प्रमाणित करत आहे. माझ्यासमोर त्यांनी सही केली आहे.

साक्षिदार – १. नाव :______________________________

दिनांक : ____________

ठिकाण : ____________ सही : _____________________________

साक्षिदार – २. नाव :______________________________

दिनांक : ____________

ठिकाण : ____________ सही : _____________________________

**थोडक्यात लक्षात ठेवण्याच्या बाबी**

इच्छापत्र किंवा मृत्यूपत्र म्हणजे आपल्या मृत्यूनंतर आपल्या मिळकतीच्या व्यवस्थापनाबद्दल कायदेशीर उद्घोषणा होय.

एकदा इच्छापत्र करण्याचा निर्णय घेतला की आपण आपल्या संपत्तीची यादी करावी. लाभाधीकाऱ्यांची निश्चीती करावी. कोणाला किती व काय द्यायचे ह्याचा निर्णय घेऊन नोंद करावी. नंतर मृत्यूपत्र लिहून काढावे. मित्र वा सल्लागारांची गरज वाटल्यास मदत घ्यावी.

इच्छापत्र लिहितांना पूर्ण नाव, वय, पत्ता लिहावा. स्वखुशीने व मनाच्या आणि शरीराच्या पूर्णपणे उत्तम अवस्थेत लिहित आहे असे स्पष्ट नमूद करावे.

प्रस्तावना म्हणजे पूर्वपीठिका लिहावी. त्यात आपली जन्मतारिख, जन्मठिकाण, शिक्षण, व्यवसाय, अनुभव, मालमत्ता व वारसा ह्याचा उल्लेख करावा. वारसा व लाभाधिकाऱ्यांचा तपशील लिहावा.

"माझी मिळकत कोणाकोणाला व कशी मिळावी हे मी ह्या मृत्यूपत्राद्वारे नमूद करुन ठेवत आहे" असे लिहावे.

मिळकत ही स्वकष्टार्जित व पूर्णपणे एकट्याच्या मालकीची असावी. त्या मिळकतीच्या विल्हेवाटाचा कायदेशीर हक्क त्या व्यक्तीकडे असावा. जर लाभार्थी मानसिकदृष्ट्या सक्षम नसेल तर पालक नेमावा.

शिवाय जर एखादा लाभार्थी अगोदर मृत्यू पावला तर त्याच्या वाटेची मिळकत इतरांना कशी द्यावी याचाही स्पष्ट उल्लेख करावा. जर असा उल्लेख नसेल तर ती मिळकत residuary estate बनते व मृत्यूपत्रातील उल्लेखानुसार त्याची वाटणी होते वा कायद्यानुसार जे हक्कदार असतील त्यांना ती मिळकत जाते.

मृत्यूपत्रात व्यवस्थापकाची नेमणूक करता येते.

मृत्यूपत्राच्या शेवटी तारीख लिहावी व हे अखेरचे मृत्यूपत्र आहे असे नमूद करावे. पूर्वी मृत्यूपत्र केलेले नाही असे नमूद करावे वा पूर्वी केलेले मृत्यूपत्र रद्द असे नमूद करावे. नंतर मृत्यूपत्र करणाऱ्याची सही वा अंगठा प्रत्येक पानावर व शेवटी करावी. दोन साक्षिदारांची नावे, पत्ता, तारीख व सही असावी. साक्षिदाराने "मृत्यूपत्रावरील कर्त्याच्या सहीचे आम्ही साक्षिदार म्हणून सही करत आहोत" असे लिहावे.

१. इच्छापत्र वयाच्या १८ वर्षे वयानंतर कोणीही सक्षम व्यक्ती बनवू शकते.

२. स्वत:च्या मालकीची संपत्ती (जी वाटप करणे शक्य आहे) इच्छापत्राद्वारे देता येते.

३. इच्छापत्र कितीही वेळा बदलता येते.

४. इच्छापत्र शक्यतो टिकावू कागदावर स्वच्छ अक्षरात खाडाखोड न करता स्पष्टपणे लिहावे. ते कोणत्याही भाषेत असू शकते.

५. संपत्ती वाटपाचा उल्लेख स्पष्टपणे करावा.

६. इच्छापत्र नोंदणी ही कायद्यानुसार बंधनकारक नसते.

७. इच्छापत्रावर दोन सक्षम व्यक्तींची स्वाक्षरी व त्यांचा तपशील असावा लागतो.

८. आपल्या इच्छेनुसार आपल्या संपत्तीचे वाटप आपल्या पश्चात करणे ह्या इच्छापत्राने साध्य करता येते.

९. इच्छापत्राद्वारे आयकर नियोजन शक्य होते.

१०. इच्छापत्र सुरक्षित जागी ठेवावे व विश्वासू व्यक्तीस सांगून ठेवावे.

११. इच्छापत्राची सुरुवात आपली पूर्वपीठिका देऊन करावी. हे इच्छापत्र आहे असे नमूद करावे. खाडाखोड झाल्यास तेथे स्वाक्षरी करावी. जोडपत्र करता येते. पण हे करतांना इच्छापत्रातील बदल स्पष्टपणे नमूद करावेत व इच्छापत्राप्रमाणेच जोडपत्र तयार करावे. प्रत्येकवेळी हे शेवटचे इच्छापत्र आहे हे नमूद करावे. नाव, ठिकाण, तारिख हे लिहावे. इच्छापत्रात तारखेला विशेष महत्त्व असते हे लक्षात ठेवावे.

एकंदरीत इच्छापत्र करणे फारसे कठिण वा खर्चिक नसते. उलट त्यामुळे आपल्यानंतर आपल्या संपत्तीचे वाटप आपल्या मर्जीप्रमाणे शांततेत पार पडते.

*****************

## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

## एक प्रसन्न अनुभव